


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २८१ वा शुक्रवार दि २३ जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मुंबईचा महापौर कोण? भाजपचं ठरलं? उत्तरमधून प्रश्न सुटणार....

## माजी हॉकीपटूसह ६ जणींची नावं चर्चेत...

**वृत्तसंस्था/मुंबई**

आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका असलेल्या मुंबई महापालिकेच्या महापौर पदासाठीची आरक्षण सोडत आज निघाली. पुढील महापौर खुल्या प्रवर्गातील असणार आहे. मुंबईच्या महापौरांना फारसे प्रशासकीय अधिकारी नसतात. पण त्यांचा मान मोठा असतो. महापौर हे मुंबईचे पहिले नागरिक असतात. मुंबई महापालिका निवडणुकीत महायुतीनं ११८ जागा जिंकत बहुमताचा आकडा ओलांडला. भाजपनं ८९, तर शिंदेसेनेनं २९ जागा जिंकल्या. शिंदेसेनेच्या मदतीशिवाय भाजप बहुमताचा आकडा गाठू शकत नाही. त्यामुळे शिंदेसेनेनं महापौरपदाची मागणी केली. अडीच वर्षांसाठी महापौरपद मागितलं. पण दिल्लीतून याबद्दल स्पष्ट सूचना आल्या आहेत. भाजपनं महापौरपद सोडण्यास स्पष्ट नकार दिलेला आहे. महापौर पदासाठी सध्याच्या घडीला भाजपमधील





पाच जणींची नावं चर्चेत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर ठाकरेसेनेतून भाजपमध्ये आलेल्या आणि प्रभाग क्रमांक २ मधून विजयी झालेल्या तेजस्वी घोसाळकर यांचं नाव आघाडीवर आहे. त्यांच्या पाठोपाठ राणी द्विवेदी (प्रभाग क्रमांक १३), सीमा शिंदे (प्रभाग क्रमांक १४), जिज्ञासा शाह (प्रभाग क्रमांक १५), श्वेता कोरगावकर (प्रभाग क्रमांक १६), शिल्पा सांगुरे (प्रभाग क्रमांक १७) यांचीही नावं चर्चेत आहेत. राणी द्विवेदी महाराष्ट्र भाजपच्या सचिव आणि प्रवक्त्या आहेत. भाजपच्या उपाध्यक्ष राहिल्या आहेत. त्या राष्ट्रीय स्तरावरील हॉकीपटूदेखील राहिल्या आहेत. त्यांच्यासोबत सीमा शिंदे, जिज्ञासा शाह, श्वेता कोरगावकर, शिल्पा सांगुरे यांचीही नावं चर्चेत आहेत. या सगळ्या नगरसेविकांचे प्रभाग क्रमांक शेजारी येतात, हे विशेष उत्तर मुंबईनं गेल्या काही वर्षांपासून भाजपला सातत्यानं साथ दिली आहे. भाजपचे ८९ पैकी २५ नगरसेवक एकट्या उत्तर मुंबईतून निवडून आलेले आहेत. इथे भाजपनं २८ जागा लढवल्या. त्यातील २५ जागा जिंकल्या. इथे उत्तर भारतीयांचं प्रमाण लक्षणीय आहे. हा मतदार आधी काँग्रेस सोबत राहिला. पण २०२४ पासून तो भाजपकडे वळला. त्यामुळे २०१७ च्या पालिका निवडणुकीतही भाजपनं भरारी घेतली. त्यामुळे उत्तर मुंबईतून भाजप पुढील महापौर कोण, या प्रश्नाचं उत्तर शोधण्याची दाट शक्यता आहे

# भूमी अभिलेख कार्यालयात गंभीर गैरप्रकारांचा आरोप...

## मोजणीत घोटाळा, नियमांना तिलांजली....

**जनसंचलन/बुलढाणा**

सिंदखेडराजा येथील भूमी अभिलेख कार्यालयात गंभीर स्वरूपाचे गैरप्रकार उघडकीस येत असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दूसरबीड येथील शेतकरी नाथा किसन साळवे यांचे पुत्र प्रदीप साळवे यांनी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे दिलेल्या तक्रारीत धक्कादायक आरोप केले आहेत. फेब्रुवारी २०२४ मध्ये अंतिम निकाली निघालेल्या पोटहिस्सा मोजणी प्रकरणात कार्यालयातील कर्मचारी मारोती थोरवे, उदय खराते आणि भूमापक प्रकाश शिंदे यांनी संगनमत करून बेकायदेशीररीत्या मोजणी केल्याचा आरोप आहे. अर्जदाराचा ताबा नसताना,सर्व सहधारकांची मोजणी न करता चुकीच्या पद्धतीने मोजणी करून जागेवर खूणा दाखवण्यात आल्या. इतकेच नव्हे तर अनधिकृत नोटीस काढून अधिकारांचा गैरवापर केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाची सुनावणी होऊन २१ ऑगस्ट २०२४ रोजी उप अधीक्षक भूमी अभिलेख यांनी फेरमोजणी व दोषी कर्मचाऱ्यांवर नियम १० नुसार कारवाईचे आदेश दिले होते.




मात्र तब्बल १८ महिने उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या इच्छाशक्तीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. नवीन मोजणी नकाशातही गंभीर तफावत आढळून आली असून समृद्धी महामार्गासाठी संपादित जमीन मुद्दाम वाढवून दाखवण्यात आल्याचा आरोप आहे. यामुळे शासनाची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तक्रारदाराला ङ्गआमचं कोणी काही बिघडवू शकत नाहीफ्फ अशी धमकीवजा भाषा वापरल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संपूर्ण प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ठरत असून दोषींना अभय दिले जात असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे

# भारतीय संस्कृतीचा गौरव- श्री गुरु तेगबहादुर साहिब...

हिंद दी चादर, म्हणजेच भारतभूमीचे कवच, अशी शीखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची जगाला ओळख आहे. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेगबहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने नागपुरातील यशस्वी आयोजनानंतर आता नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी रोजी भव्य अशा आध्यात्मिक समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या निमित्ताने गुरु तेगबहादुर साहिब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख: सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. ङ्गएकम सत् विप्रा बहुधा वदंतीफ म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत. गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत, श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो. गुरु तेगबहादुर साहिब यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे शीखांचे सहावे गुरु श्री हरगोविंद साहिब यांच्या घरी झाला. गुरु हरगोविंद साहिब यांच्या पाच पुत्रांपैकी ते धाकटे होते. ते अध्यात्मिक रंगात रंगलेले, अंतर्मुख आणि मौनप्रिय होते. गुरुपदाच्या गादीची जबाबदारी स्वीकारल्यावर गुरु तेगबहादुर साहिब यांनी शीख समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न सुरु केले. १६६५ च्या सुमारास त्यांनी आनंदपूर नावाचे स्थळ वसवले. पुढे ते ङ्गआनंदपूर साहिबफ म्हणून प्रचलित झाले. शीख धर्मातील अत्यंत पवित्र अशा स्थळांपैकी ते एक मानले जाते. गुरु तेगबहादुर साहिब यांनी तत्कालीन बंगाल, बिहार, आसामसह देशातील अनेक भागांना भेटी देऊन आपल्या विचारांचा प्रचारप्रसार केला. १६६६ मध्ये पाटणा (पाटणा साहिब) येथेच त्यांच्या घरी गुरु गोविंदसिंह यांचा जन्म झाला. ते शीखांचे दहावे गुरु होत. साहित्य, उपदेश आणि आध्यात्म गुरु तेगबहादुर साहिब हे केवळ धर्मगुरुच नव्हते, तर ते उत्तम साहित्यिक आणि रचनाकारही होते. त्यांनी आपल्या अनेक रचनांच्या माध्यमातून शीख तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सहज सोप्या भाषेसह त्यांचा भावप्रवाह अतिशय सशक्त आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने वैराग्य, नाम ङ्गसिमरनफ (देवाचे स्मरण) आणि जीवनातील नश्वरता हाच ठरतो. त्यांचे विवेचनाचे विषयही धार्मिक, तत्त्वमिमांसक आणि जीवनातील क्षणभंगुरता दर्शवणारे आहेत. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या रचनांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचनांना सामान्यतः ङ्गशबदफ किंवा भजन म्हटले जाते. ज्यांत ईश्वर, मानवी संबंध, सेवा, मनशरीर, मृत्यु, प्रतिष्ठा आणि मानवी स्थिती यांसारख्या विषयांचा व्यापक आवाका आढळून येतो. गुरु तेगबहादुर सिंह साहीब यांच्या जीवनकार्याचा हा कालखंड भारतीय इतिहासातील अत्यंत आव्हानात्मक असा काळ मानला जातो. परकीय आक्रमकांनंतर दाखल झालेल्या तत्कालीन शासकांची सत्ता भारताच्या बऱ्याच भागात स्थिरावली होती. या सत्तेच्या कट्टरतेचा आणि आक्रमक विस्ताराचा असा काळ होता. मध्ययुगातील हाच काळ तत्कालीन शासकांच्या जुलमी राजवटीचाही मानला जातो. सत्ताधीश हे धार्मिकदृष्ट्या संकीर्ण आणि अत्यंत कडव्या मनोवृत्तीचे होते, असे इतिहास सांगतो. त्यामुळे स्वाभाविकपणे अन्य समुदायांसाठी हा काळ अतिशय खडतर आणि अस्थिरतेने परिपूर्ण असा काळ मानला जातो. अशा या प्रतिकूल परिस्थितीत गुरु तेगबहादुर यांनी अत्याचाराचा प्रतिकार अत्याचाराने नव्हे तर त्यागाने केला. गुरु तेगबहादुर साहीब यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे सर्वोच्च बलिदान. साधरणतः १६७५ सालचा तो काळ होता. सत्ताधाऱ्यांच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या काश्मिरी पंडिताचे काही प्रतिनिधी आनंदपूर साहीब येथे गुरु तेगबहादुरांकडे मदत मागण्यासाठी आले होते. या लोकांना सक्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जात होते. काश्मिरी पंडितांची ही व्यथा ऐकून गुरु तेगबहादुर साहीब अतिशय धीरगंभीर झाले होते. अशा संकटापासून वाचण्यासाठी आता बलिदानाची गरज आहे, असे उत्तर त्यांनी यावर दिले. ङ्गजर आमच्या गुरुंनी धर्मांतर केलं, तर आम्ही सर्व स्वतः हून तुमचा धर्म स्वीकारूफ, असे सत्ताधीशाला जाऊन सांगण्याची सूचना त्यांनी काश्मिरी पंडितांना केली. पुढे गुरु तेगबहादुर साहीब हे दिल्लीला पोहचल्यावर बादशहाने त्यांना कैद केले. त्यांना प्रलोभने दाखविली गेली, धर्म स्वीकार करण्यास सांगण्यात आले. गुरुजींनी या दोन्ही गोष्टी नाकारल्या. त्यांच्या समक्षच त्यांच्या शिष्यांना शहीद करण्यात आले. पण, गुरु तेगबहादुर साहीब हे आपल्या निश्चयापासून अजिबात ढळले नाहीत. त्यांनी बादशहाचे आदेश मानण्यास नकार दिला. संतापलेल्या बादशहाने त्यांचे शीर धडावेगळे करण्याचे आदेश दिले. तो आदेश अखेर अंमलात आणला गेला. गुरु तेगबहादुर साहीब यांचे सर्वोच्च बलिदान ज्या ठिकाणावर झाले, ते ठिकाण आज दिल्लीच्या चांदणी चौक परिसरातील ङ्गसीस गंज साहिबफ गुरुद्वारा म्हणून ओळखले जाते. जर माझ्या बलिदानानं निरपराध लोकांच्या श्रद्धेचं रक्षण होणार असेल, तर तेच माझं सर्वोच्च धर्मकार्य ठरेलफ, असा संदेश त्यांनी त्यावेळी दिला होता. हे शब्द केवळ त्यागाचे नव्हते, तर संपूर्ण मानवतेच्या रक्षणाची घोषणा करणारे होते. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेची सर्वोच्च मूल्य जपण्यासाठीच त्यांनी हा निर्णय घेतला होता. ङ्गसीस गंज साहिबफ गुरुद्वारा आजही त्यांचा त्याग आणि मानवतेप्रती समर्पणाची साक्ष देतो. शीखांचे गुरु असूनही गुरु तेगबहादुर साहीब यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. ते सर्व धर्मांना समान मानणारे होते. सर्व मानव हे एकाच परमात्म्याचे पूत्र आहेत, अशीच त्यांची शिकवण होती. धर्म म्हणजे कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे, हा संदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. त्यांचा हा संदेश आजही प्रासंगिक ठरतो.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मामाच्या मुलाचं लग्न लागलं, घरी येताना कुटुंबावर काळाचा घाला

## पतीसह, पत्नी आणि मुलगीही ठार..

**कोल्हापूर :** जालना: जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील महाकाळ फाट्यावर छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर काल सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. भरधाव कंटेनरने २ दुचाकींना पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या या अपघातात दुचाकीवरील एकाच परिवारातील पती-पत्नी, मुलगी हे ठार झाले तर दुसऱ्या दुचाकीवरील पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत.यासंदर्भात अधिक माहिती अशी की, विकास अन्नासाहेब जाधव (वय २८) हे पत्नी साक्षी (वय २३) आणि मुलगा अथर्व (वय ४ सर्व रा. रोहीलागड ता. अंबड, ह. म. शहानगर चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर) हे उमापुर (ता. गेवराई, जि. बिड) येथे मामाच्या मुलाचे लग्न लावून दुचाकीने (एमएच २०-एचसी ३०१३) घराकडे जात होते. दरम्यान, शहागड-वडीगोद्री रस्त्यावर महाकाळा फाट्याजवळ भरधाव कंटेनरने (एनएल ०१-जी९३२२) समोर चाललेल्या दोन दुचाकींना पाठीमागून जोराची धडक दिली. यावेळी कंटेनरने दूरपर्यंत या दोन्हीही दुचाकींना फरफटत नेल्या. अपघातस्थळी उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी व काही वाहनचालकांनी वाहन थांबवत या कंटेनरला थांबवले, मात्र तोपर्यंत कंटेनर चालकाने घटनास्थळावरून पोबारा केला होता. यावेळी नागरिकांनी दुचाकीवरील जखमींची पाहणी केली असता तिघेही मृत अवस्थेत आढळून आले. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार मयत साक्षी जाधव या गरोदर होत्या. दुसऱ्या दुचाकीवरील (एमएच १६-सीएल ९७३७) संतोष बनसोडे (वय २९), त्यांची पत्नी मोनिका (वय २५, रा. वळदगाव, जि. छत्रपती संभाजीनगर) हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मयत साक्षी जाधव आणि अथर्व यांच्या मृतदेहाचे पाचोड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. तसंच मयत विकास जाधव यांच्यासह जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.




दरम्यान, या भीषण घटनेनंतर राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. घटनास्थळी गोंदी ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण हवाले, जमादार रामदास केंद्रे, दिपक भोजने आणि महाकाळा येथील ग्रामस्थांनी कंटेनरखालील मयतांना जेसीबीच्या साह्याने बाहेर काढण्यासाठी मदत केली. तसेच खोळंबलेली वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना एक ते दीड तास कसरत करावी लागली आहे. काही क्षणातच एक हसतं खेळतं कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## दीड वर्षांच्या लेकीला विष दिलं अनब पती-पत्नीने आयुष्य संपवलं

**रांची :** आपल्या दीड वर्षांच्या लेकीला आपल्याच हाताने विष देत तिचा जीव घेतला. त्यानंतर पती - पत्नीनेही विष प्राशन करत आपल्या आयुष्याची अखेर केल्याची दुःखद घटना समोर आली आहे. ही भयंकर घटना झारखंडमधील धनबाद येथील जोगता पोलीस स्टेशन परिसरात घडल्याची माहिती समोर आली आहे. येथील एकाच कुटुंबातील तिघांच्या मृत्यूने परिसरात एकच खळबळ माजली आहे.धनबाद येथील एकाच कुटुंबातील तिघे पती, पत्नी आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी यांनी विष प्राशन करून आपलं आयुष्य संपवलं आहे. या पती-पत्नीने आपला जीव देण्यापूर्वी आपल्या मुलीला विष दिल्याचं सांगितलं जात आहे. मृतांची ओळख राजा मियाँ, त्यांची पत्नी अमिना परवीन आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी मायरा परवीन अशी झाली आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, कौटुंबिक वादातून या पती-पत्नीने लेकीला विष देत आयुष्याची अखेर केल्याचं वृत्त आहे. स्थानिक रहिवाशांकडून माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तिघांनाही तातडीने धनबादच्या एनएमसीएचमध्ये नेले. मात्र, तोपर्यंत खूप उशिर झालेला होता.

## झुंड चित्रपटातील अभिनेता रवीसिंग छेत्री याचा निर्घृण खून



**नागपूर :** नागराज मंजुळे यांच्या 'झुंड'चित्रपटातील बाबू छत्री या भूमिकेने प्रकाश झोतात आलेला अभिनेता प्रियांशू उर्फ बाबू रवीसिंग छेत्री ऊर्फ बाबू छत्री (वय २१ रा. लुंबिनीनगर) याचा निर्घृण खून करण्यात आला. ही थरारक घटना जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नारा परिसरातील ओमसाईनगर येथील निर्माणाधीन इमारतीत घडली. या घटनेनं पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. पैशाच्या वादातून मित्रानेच त्याला संपिवल्याचं तपासादरम्यान पुढं आलं आहे. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी बाबूच्या मित्राला अटक केली. ध्रुव उर्फ ट्रुप शाहू (वय २०, रा. नारा), असं अटकेतील मारेकऱ्याचं नाव आहे. बाबू व ध्रुवला गांजा व दारूचं व्यसन आहे. बाबू याच्याविरुद्ध चोरीचे गुन्हे दाखल आहेत. लोहमार्ग पोलिस दलातही त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल आहेत.

ध्रुव व बाबूमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पैशासाठी वाद सुरू होता. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये हाणामारीही झाली. या हाणामारीनंतर बाबू आपल्याला ठार मारेल, अशी भीती ध्रुव याला होती. काल मंगळवारी रात्री बाबू हा दारू पिवून घरी झोपला होता. रात्री ध्रुव त्याच्या घरी आला. त्याला उठविले. त्यानंतर ध्रुव हा मोटारसायकलने बाबूला घेऊन निमणाधीन इमारतीत गेला.

तेथे दोघांनी दारू व गांजा प्यायला. त्यानंतर दोघांमध्ये पैशावरून वाद झाला. वाद विकोपाला गेला. संतप्त ध्रुवने चाकूने बाबूच्या शरीरावर वार केले. बाबू गंभीर जखमी झाला. ध्रुव तेथून पसार झाला. दरम्यान, परिसरातील नागरिकांना बाबू हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. नागरिकांनी पोलिसांना माहिती देत त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासून बाबूला मृत घोषित केले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून ध्रुव याचा शोध सुरू केला. ध्रुव हा नारा परिसरातील झुडपात मद्यधुंद अवस्थेत पोलिसांना दिसला. पोलिसांनी त्याला अटक केली.

## गाडीला कट लागल्याने एकाला संपवलं; आरोपींसाठी पोलिसांनी सापळा रचला अनब..

**नागपूर :** गाडीचा कट लागल्याने दोघांनी मारहाण करून योगेश व्यंकटराव झोडे रा. देवळी गुजर याची हत्या केली. ही घटना बुटीबोरीतील कोलार येथे घडली. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून दोन मारेकऱ्यांना अटक केली. आदित्य वीरेंद्र बेले (वय २८ रा. दसरा रोड, महाल) व हिमांशू रमेशचंद्र गुप्ता (रा.गणेशनगर, न्यू कळमना), अशी अटकेतील मारेकऱ्यांची नावे आहेत. योगेश हा मालवाहू वाहनाने श्रमिकांची ने आण करण्याचे काम करायचा.

३० सप्टेंबरला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास तो गाडीने बुटीबोरीकडे येत होता. कोलार परिसरात योगेशच्या गाडीचा कट आदित्यचा गाडीला लागला. दोघांनी त्याला थांबविले. त्याला जबर मारहाण केली व पसार झाले. नागरिकांनी त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. आदित्य व हिमांशूने मारहाण




केल्यानं त्याचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. बुटीबोरी पोलिसांनी मंगळवारी खुनाचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आदित्य व हिमांशूची १० ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

## दोघांचं एकाच मुलीवर प्रेम; धारदार शस्त्राने एकाला संपवलं

**वर्धा :** वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात प्रेमप्रकरणातून उद्भवलेल्या वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना आर्वी शहराच्या मध्यवर्ती गांधी चौकात घडली असून, या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीचं नाव सलीम सबदर शा (वय ३०, रा. संजय नगर, आर्वी) असं असून, पोलिसांनी निखिल बुरे (रा. हरदोली) या तरुणास अटक केली आहे.प्राथमिक माहितीनुसार, सलीम आणि निखिल या दोघांमध्ये एका तरुणीवरून गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता. दोघांनाही तीच मुलगी आवडत असल्यानं त्यांच्यामध्ये वैर निर्माण झालं होतं. याच प्रेम संबंधातून निर्माण झालेल्या वादाचे रूप काल थेट हाणामारीत बदललं. दुपारच्या सुमारास गांधी चौकात सलीम आणि निखिल यांच्यात पुन्हा वाद झाला. वाद चिघळताच निखिलने आपल्याजवळील धारदार शस्त्राने सलीमवर वार केले. या हल्ल्यात सलीम गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केलं. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केलं.घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आरोपी निखिल बुरे याला अल्पावधीतच ताब्यात घेण्यात आलं असून, त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.



या घटनेमुळे आर्वी शहरात संतापाची लाट उसळली आहे. गांधी चौक परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असून, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे. प्रेमसंबंधातून झालेल्या या हत्येनं आर्वी शहर हादरलं असून, पुन्हा एकदा युवकांमधील अस्थिर भावनांचा आणि रागाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# विवेक ओबेरॉय अडचणीत; ३४ कोटींच्या हिरे घोटाळ्याप्रकरणी चौकशी, नेमकं प्रकरण काय?

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉय अडचणीत सापडला आहे. मुंबई पोलिसांनी हिरे घोटाळ्याप्रकरणी प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. फसवणूक, बनावट कागदपत्रे आणि चेक बाऊन्स झाल्याच्या आरोपांवरून चौकशीत विवेक ओबेरॉयसह तीन आरोपींची नावे समोर आली आहेत.

बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉय कायम त्याच्या चित्रपटांमुळे चर्चेत असतो. मात्र आता विवेक ओबेरॉय चांगलाच अडचणीत सापडला आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने क्युपिड डायमंड्स प्रायव्हेट लिमिटेडशी संबंधित एका हिरे घोटाळ्याप्रकरणी प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. कंपनीचे संचालक निमेश पियुष मेहता उर्फ टोनी यांनी अनेक व्यक्तींवर सुमारे ३४.७५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप केला आहे.

माहितीनुसार, फसवणुकीच्या आरोपात विवेक ओबेरॉयचे नाव देखील सामील आहे. तक्रारीनुसार, पोलिसांनी सतीश दरियानानी, रिकी वासवानी आणि बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉय या तीन व्यक्तींची फसवणुकीसंबंधित चौकशी सुरू केली आहे. तक्रारीनुसार, गुन्हा २०२१ ते सप्टेंबर २०२५ या काळात घडली. या काळात आरोपींनी अनेक पद्धतींचा वापर करून तक्रार करणाऱ्या व्यक्तीला फसवण्याचा कट रचला.

तक्रारीत म्हटल्यानुसार, सुरुवातीला आरोपींनी कमी प्रमाणात हिरे खरेदी केले आणि विश्वास मिळवण्यासाठी वेळेवर पैसे दिले. त्यानंतर दुबईतील 'सोलिटारियो डायमंड्स'च्या आयपीओमध्ये २५ टक्के भागभांडवल देण्याचे आश्वासन देऊन एका मोठ्या व्यावसायिक कराराचा प्रस्ताव ठेवला.मोठ्या प्रमाणात चांगल्या दर्जाचे आणि मोठ्या किंमतीचे हिरे मिळवल्यानंतर, आरोपींनी पोस्ट-डेटेड चेक (पीडीसी) दिला, परंतु नंतर त्यांचे पेमेंट थांबवले. ज्यामुळे चेक बाऊन्स झाला. चौकशीदरम्यान, तक्रारदार कंपनीचे दुसरे संचालक मिलन शाह यांची बनावट सही केल्याचे देखील समोर आले. आरोपींनी फसवणूक करण्यासाठी बनावट कंपनी लोगो, लेबल्स आणि शिक्के तयार केले. एका अधिकाऱ्याने खुलासा केला की, आरोपींनी कुरिअरद्वारे हिऱ्यांच्या ऐवजी कमी दर्जाचे स्टोन पाठवले आणि दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. तसेच मूळ हिरे परत केल्याचा खोटा दावा केला. ईओडब्ल्यूच्या मते, हे प्रकरण सध्या प्राथमिक तपासाच्या टप्प्यावर आहे, ज्यामध्ये कागदपत्रे आणि बँक व्यवहारांची बारकाईने तपासणी केली जात आहे.



## 'डेमोन कॉलनी ३'चा फर्स्ट लुक जारी

**मुंबई :** तमिळ चित्रपटसृष्टीतील बहुचर्चित हॉरर-थ्रिलर फ्रेंचाइजी 'डेमोन कॉलनी' स्वत:च्या नव्या भागासह प्रेक्षकांना घाबरविण्यास तयार आहे. डेमोन कॉलनी ३ चा फर्स्ट लुक समोर येताच चित्रपटवरून लोकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. पोस्टरमध्ये भय, रहस्य आणि अंधाराची झलक दिसून येते, यावेळी कहाणी पूर्वीपेक्षा अधिक धोकादायक वळण घेणार असल्याचे यातून स्पष्ट होते.

या चित्रपटासोबत पुन्हा एकदा अरुल्निधी स्वत:च्या लोकप्रिय व्यक्तिरेखेत परतत आहेत. पहिल्या दोन भागांमध्ये ज्या रहस्यमय जग आणि शापित घटनांनी प्रेक्षकांना बांधून ठेवले होते, तिसऱ्या भागात तीच कहाणी आणखी पुढे जाताना दिसून येणार आहे. दिग्दर्शक अजय ज्ञानमुथु यांनी या फ्रेंचाइजीला केवळ भयापुरती मर्यादित ठेवलेले नाही, तर यात मनोवैज्ञानिक तणाव आणि रहस्याचे असे जाळे विणले आहे, ज्याने डेमोन कॉलनीला वेगळी ओळख मिळवून दिली आहे.

'द एंड इज टू फार' अशा टॅगलाइनसह पोस्टर शेअर करण्यात आले आहे. मागील चित्रपटांमध्ये सुरू असलेला अंधाराचा खेळ अद्याप संपलेला नाही असे संकेत ही टॅगलाइन देते. पूर्वीच्या भागांमध्ये ज्या अलौकिक शक्ती आणि शापाचा सामना व्यक्तिरेखांनी केला होता, त्यांचा प्रभाव अद्याप कायम असून यावेळी संघर्ष आणखी भयावह होणार आहे.



## 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' हास्यासोबत सस्पेन्सचा तडका

**मुंबई :** मराठी सिनेसृष्टीतील प्रेक्षकांच्या लाडक्या कुरळे बंधू पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परत येत आहेत. नुकताच प्रदर्शित झालेल्या 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या चित्रपटाच्या ट्रेलरने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आणि अपेक्षा प्रचंड वाढवल्या आहेत. हा चित्रपट केवळ विनोदापुरता मर्यादित नसून शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या गोंधळाची आणि गैरसमजांची धमाल गोष्ट असल्याचे ट्रेलरवरून स्पष्ट होते.

ट्रेलरमध्ये रतन, मदन आणि चंदन यांच्या आयुष्यात सतत घडणाऱ्या विचित्र घटनांची झलक पाहायला मिळते. कधी परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणाबाहेर जाते, तर कधी गैरसमजांचा गुंता अधिकच वाढत जातो. या सगळ्यात बबनची खट्याळ एन्ट्री कथेला वेगळंच वळण देते. वेगवेगळ्या स्वभावांची माणसं एकत्र आली की काय गोंधळ उडतो, याचं उत्तम उदाहरण हा ट्रेलर देतो. या गोंधळात अभिनेत्री रिंकू राजगुरूची एन्ट्री विशेष लक्ष वेधून घेते. ती नेमकी कोण आहे, ती त्यांच्या आयुष्यात का आली आणि तिच्या येण्यामुळे सगळेच इतके अस्वस्थ का झाले आहेत, याचं उत्तर ट्रेलर थेट देत नाही. त्यामुळे तिच्या भूमिकेबाबत कुतूहल अधिकच वाढतं. ही एन्ट्री योगायोग आहे की एखाद्या मोठ्या वळणाची सुरुवात, हे पाहणं रंजक ठरणार आहे. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक अंकुश चौधरी म्हणतात, ''हा चित्रपट केवळ विनोद नाही, तर माणसांच्या स्वभावातून आणि अचानक घडणाऱ्या प्रसंगांतून तयार होणाऱ्या गोंधळाची धमाल गोष्ट आहे. ट्रेलरमध्ये दिसणाऱ्या मजेपेक्षा अनेक पटींनी मोठा अनुभव प्रेक्षकांना चित्रपटात मिळणार आहे. अंकुश चौधरी दिग्दर्शित या चित्रपटात अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव यांसारखे दिग्गज कलाकार असून संजय नार्वेकर पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसणार आहेत. छायाचित्रण संजय जाधव यांनी केले आहे. हा बहुप्रतिक्षित चित्रपट येत्या ३० जानेवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.




## अक्षय कुमारच्या ताफ्यातील गाडीचा भयंकर अपघात

**मुंबई :** अभिनेता अक्षय कुमारच्या कारचा अपघात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सोमवारी रात्री हा अपघात घडला आहे. अभिनेता अक्षय कुमार शुटिंग संपवून घरी जात असताना हा भीषण अपघात झाला आहे. तो विमानतळावरून जुहू येथील आपल्या घरी जात होता. तेव्हा एका मर्सिडीज गाडीने रिक्षाला धडक दिली. ही रिक्षा पुढे अक्षय कुमारच्या सिक्युरिटी व्हॅनला धडकली.

अक्षय कुमारच्या गाडीचा हा अपघात भीषण होता. यामध्ये रिक्षाचालकाला दुखापत झाली. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जुहू येथे एक मर्सिडीज गाडी वेगाने येत होती. या गाडीने रिक्षाला धडक दिली. पुढे ती रिक्षा अक्षय कुमारच्या सिक्युरिटी व्हॅनला धडकली. यामध्ये सुदैवाने कोणतीही जिवितहानी झालेली नाही. अक्षय कुमारदेखील सुरक्षित आहेत. मिळालेल्या माहितीनुसार,





सोमवारी रात्री ८.४५ ते ९ यामध्ये हा अपघात झाला. अक्षय कुमारसोबत पत्नी ट्विंकल खन्नादेखील होती. सुदैवाने अभिनेता आणि त्याची पत्नी दोघेही सुखरूप आहे. जुहू येथील गांधीग्राम रोड इस्कॉन मंदिर परिसरात हा अपघात घडला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही रिक्षा अक्षय कुमारच्या सिक्युरिटी ताफ्यातील एका इनोव्हा कारला धडकली. अक्षय कुमार आणि ट्विंकल खन्ना हे दुसऱ्या गाडीने पुढे गेले होते. त्यांच्या गाडीलादेखील थोडा धक्का बसला परंतु त्यांना दुखापत झालेली नाही. या अपघातात रिक्षाचालकाला दुखापत झाली. त्याला रुग्णालयात दाखल केले. अक्षय कुमारच्या वाहनाच्या अपघाताचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामुळे चाहते खूप चिंतेत होते. मात्र, आता अक्षय कुमार आणि पत्नी ट्विंकल खन्ना सुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे. सदर घटनेची माहिती मिळता पोलिस घटनास्थळी पोहचले. विश्वास नांगरे पाटील यांनीदेखील अपघात झालेल्या ठिकाणी पाहणी केली.

# अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचा जिल्हा दौरा...

## २७ व २८ जानेवारीला घेणार विविध विभागांचा आढावा...

**जनसंचलन/ बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम हे दि. २७ व २८ जानेवारी २०२६ रोजी बुलढाणा जिल्ह्यात दोन दिवसीय जिल्हा दौऱ्यावर येत आहे. दौऱ्यादरम्यान ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांचा आढावा घेणार आहे. त्यांच्या दौऱ्यानुसार मंगळवार दि. २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बुलढाणा शासकीय विश्रामगृह येथे आगमन व आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा नगरपरिषदेच्या सभागृह हॉलमध्ये बुलढाणा, मलकापूर, शेगाव, खामगाव व चिखली नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांचेसोबत जिल्हा परिषदकडे प्राप्त होणाऱ्या महसूलाचे एकूण ५ टक्के निधी आस्थापना, वजा खर्च, आर्थिक दुर्बल घटकावर केलेल्या खर्चाची मागील ५ वर्षाचा आढावा व कामाची तपासणी तसेच नागरी दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, लाड पागे योजनेतील प्रलंबित प्रकरणे, अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणे तसेच अनुसूचित जातींसाठी प्राप्त होणाऱ्या निधीबाबत तपासणी. दुपारी २ वाजता राखीव व दुपारी २.३० वाजता शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या अंतर्गत लाड पागे समितीच्या नियुक्ती संदर्भातील सर्व प्रलंबित प्रकरणांबाबत आढावा. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन), बुलढाणा यांच्यासोबत लाड पागे समितीच्या प्रलंबित प्रकरणांबाबत बैठक. दुपारी ४ वाजता जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यासोबत तर सायंकाळी ५ वाजता जिल्हा परिषदचे महिला व बाल विकास अधिकारी यांच्यासोबत आढावा बैठक, रात्री शासकीय विश्रामगृह येथे मुक्काम करतील. बुधवार, दि. २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता बुलढाणा नगरपरिषद सभागृह हॉल येथे मेहकर, नांदुरा, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, जळगाव जामोद, मोताळा व संग्रामपूर नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित नगरपरिषदांच्या ५ टक्के निधीचा वापर, आर्थिक दुर्बल घटकांवरील खर्च, नागरी दलित वस्ती, रमाई आवास योजना, लाड पागे योजनेतील प्रलंबित प्रकरणे, अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणे तसेच अनुसूचित जातींसाठी प्राप्त निधीबाबत सविस्तर आढावा व तपासणी, दुपारी २ वाजता राखीव, त्यानंतर सोयीनुसार मुंबईकडे रवाना होतील.

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत जिल्ह्यात हप्ते वितरण सुरळीत निधीची कमतरता नाही

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रशासन स्तरावरून देशामध्ये निधी वितरणाच्या प्रणालीमध्ये सुधारणा करून नवीन एसएनए-स्पर्श प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदानाचे हप्ते वितरीत करण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावरून सुरू करण्यात आली असून ती सुरळीतपणे सुरू आहे. बुलढाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २.० अंतर्गत सन २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीसाठी १ लाख ३ हजार ४५६ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत ९० हजार ११४ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, ३३ हजार २०२ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, तर १९ हजार ३९८ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता पंचायत समिती स्तरावरून वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना देखील टप्प्याटप्प्याने हप्ते वितरणाची कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २.० अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यासाठी एसएनए-स्पर्श प्रणालीवर १९६.४३ कोटी रुपये निधी उपलब्ध असून, त्यापैकी ५६.९९ कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. आतापर्यंत जिल्ह्यासाठी १३६.४४ कोटी रुपये निधी शिल्लक आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यात घरकुल बांधकामासाठी अनुदान वितरीत करण्यास निधीची कोणतीही कमतरता नसून, लाभार्थ्यांनी बांधकामाच्या प्रगतीनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून हप्त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा; जिल्हा ग्रंथालय कार्यालयात ग्रंथप्रदर्शन व काव्यवाचन

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. या पंधरवड्यानिमित्त जिल्हा ग्रंथालय कार्यालयात ग्रंथप्रदर्शन व काव्यवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी व साहित्यिक सर्जेराव चव्हाण तसेच कवयित्री वैशाली तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी साहित्याचे वाचन वाढवूनच मराठी भाषा पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवता येईल, असे मत सर्जेराव चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केले. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी प्रमाणभाषेसह मराठी बोलीभाषांचा दैनंदिन जीवनात वापर करणे आवश्यक असल्याचे मत कवयित्री वैशाली तायडे यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी आशयघन व दर्जेदार मराठी कवितांचे सादरीकरण करून रसिकांची दाद मिळविली. या कार्यक्रमास वाचक, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी तसेच मराठी भाषेवर प्रेम करणारे ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय मऱ्हे यांनी तर आभार प्रदर्शन अजय सिरसाट यांनी केले. ग्रंथप्रदर्शनी दि. २८ जानेवारी २०२६ पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार तसेच वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी ग्रंथालयाचे सभासद व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४



पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार
हल्ला बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा जालना रोडवर गोवंश तस्करीचा पर्दाफाश!

## ५ आरोपी अटकेत, ५६ बैलांची सुटका; ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त

जनसंचलन/ चिखली




बुलढाणा-जालना रोडवरील दांडगे लेआऊट परिसरात गोवंश तस्करीचा भयंकर आणि अमानवी चेहरा उघडकीस आला आहे. २२ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास चिखली पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत दोन आयशर वाहनांत कत्तलीसाठी निर्दयपणे कोंबून नेण्यात येत असलेले तब्बल ५६ गोवंश बैल वाचवण्यात आले असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींनी कोणताही परवाना नसताना दोरीने एकमेकांना घट्ट बांधून, दाटीवाटीने एकमेकांच्या अंगावर दाबून, चारापाणी न देता बैलांची क्रूर व अमानवी वाहतूक केल्याचे स्पष्ट झाले आहे. हे बैल थेट कत्तलीसाठी नेले जात असल्याची प्राथमिक माहिती असून या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात दोन आयशर वाहने (किंमत अंदाजे २० लाख रुपये) तसेच ५६ बैल (किंमत सुमारे ११.४० लाख रुपये) असा एकूण ३१.४० लाख रुपयांचा मुद्देमाल आहे. आरोपींविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे, पोलीस उपनिरीक्षक शरद भागवतकर यांच्यासह संपूर्ण पथकाने दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे.

# शिवशंभू आखाडा रोहिणखेडचे राज्यस्तरीय स्पर्धेत दैदिप्यमान यश



जनसंचलन/ पवनी

येथे दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय अस्टेडू आखाडा शिवकालीन मर्दानी खेळ स्पर्धेत रोहिणखेड येथील शिवशंभू आखाड्याच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत शिवशंभू आखाड्याच्या विद्यार्थ्यांनी एक सुवर्ण, दोन रौप्य व पाच कास्य पदकांची कमाई करत आखाड्याचा तसेच गावाचा नावलौकिक वाढवला आहे. या स्पर्धेत रेणुका विजय गुजर हिने -१९, ३५ ते ४० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. विशाल गंगाराम सोळंके (-१४, ३० ते ३५ किलो) व यश सुभाष इंगळे (-१७, ५१ ते ५५ किलो) यांनी रौप्यपदक मिळवले. गणेश संदीप भुसारी, वेदिका देविदास सपकाळ, प्रगती शांताराम राजस, वेदांती प्रकाश गलबले व आदिती प्रकाश गलबले यांनी कास्यपदक मिळवत संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. सन २०२३ मध्ये संभाजी शिवाजी हाडे यांनी स्थापन केलेल्या शिवशंभू आखाड्यातून शिवकालीन मर्दानी खेळांचा प्रसार व संस्कार घडवण्याचे कार्य सुरू आहे. बल हेच जीवनफ्क्र या ध्येयमंत्रानुसार खेळाडूंची शारीरिक, मानसिक व चारित्र्य घडण घडवली जात आहे. या यशाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक व पालकांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सहकार विद्या मंदिर व ज्यु. कॉलेजचा चि. ओमची महाराष्ट्र हॉकी संघात निवड...




जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक सहकार विद्या मंदिर व ज्यु. कॉलेजचा विद्यार्थी चि. ओम शिवाजी वाटाणे इ.१० वी यांची महाराष्ट्र हॉकी संघात निवड झाली आहे. चि. ओम हा सहकारचा निवासी विद्यार्थी आहे. चि. ओमच्या सातत्यपूर्ण व कठोर परिश्रमाचे फळ मिळाले. चि. ओमच्या या निवडी मुळे सहकारच्या शिरपेचात अजुन एक मानाचा तुरा रोवण्यात आला आहे. वर्धा येथे महाराष्ट्र हॉकी संघाचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. रांची (झारखंड) येथे दि. २७ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०२६ या दरम्यान राष्ट्रीय हॉकी स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. चि. ओमचे बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय भाईजी, बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. श्री. सुकेशजी झंवर व संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्यात आहे. चि. ओमने त्याच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, शिक्षक व प्रशिक्षक यांना दिले

# खंडणी,सरकारी कामात अडथळा आणि विनयभंगाच्या आरोपातून पत्रकाराची निर्दोष मुक्तता...

वृत्तसंस्था/बुलडाणा




खंडणीची मागणी, सरकारी कामात अडथळा आणणे आणि महिलेचा विनयभंग करणे अश्या गंभीर स्वरूपाच्या आरोपातून पत्रकार अजहर शेख याची बुलडाणा जिल्हा सत्रन्यायालयाने सबळ पुराव्याअभावी २२ जानेवारी रोजी निर्दोष मुक्तता केली आहे.

प्रकरणाची हकीकत अश्या प्रकारे आहे की,प्रा. आरोग्य केंद्र एकलारा, ता.चिखली येथे कार्यरत तक्रारदार महिला वैद्यकीय अधिकारी यांनी दि.३० सप्टेंबर २०२३ रोजी चिखली पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले होते की,प्रा.आरोग्य केंद्र एकलारा येथे माझी ओपीडी ड्यूटी सुरू असतांना आरोपी अजहर शेख याने माझ्या सरकारी कामात अडथळा आणला आणि शिवीगाळ करत झटापट केली.अश्या तक्रारीवर आरोपी पत्रकार अजहर शेख विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.या तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपीला अटक करून दोषारोपपत्र दाखल केले होते.आरोपीच्या वतीने ॲड.राज मोहम्मद शेख यांनी प्रभावी युक्तिवाद केला.त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, तक्रारदाराने केलेले आरोप हे केवळ आकसापोटी आणि पूर्वग्रहातून करण्यात आले आहेत.घटनेच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या साक्षीदारांच्या जबानीत कमालीची विसंगती आहे.सरकारी कामात अडथळा निर्माण झाल्याचा कोणताही ठोस पुरावा किंवा सीसीटीव्ही चित्रीकरण पोलीस सादर करू शकले नाहीत. विनयभंग आणि खंडणीच्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसून, आरोपीला खोट्या प्रकरणात अडकवण्यात आले आहे.न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे विचारात घेऊन,ॲड. राज मोहम्मद शेख यांचा युक्तिवाद मान्य केला. सरकारी पक्ष आरोपी अजहर शेख याच्यावर लावलेले आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे ताशेरे ओढत न्यायालयाने पत्रकार अजहर शेख याची सर्व आरोपांतून मुक्तता केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८